# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर - वसई-विरार यांचे
कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे
दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
**E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in**


प्रेस नोट क्र. १९/२०२५ दिनांक १३/०१/२०२५

## जबरी चोरी करणाया आरोपीस पकडण्यास आचोळे पोलीस ठाणेच्या गुन्हे प्रकटिकरण पथकास यश

दिनांक ०१/०१/२०२५ रोजी सकाळच्या सुमारास फिर्यादी श्री. विनय सत्येंद्र चौरसिया, वय-२८ वर्ष, राहणार - नालासोपारा पुर्व, ता. वसई, जि. पालघर, हे आचोळे क्रॉस रोड येथील एस.टी. बस स्टॉपमध्ये बसलेले असताना तेथे दुचाकीवरुन दोन अनोळखी इसम येवुन त्यांनी फिर्यादी यांचा जबरदस्तीने मोबाईल, हातातील कडे, आंगठी, इअर कॉड व खिशातील १०,०००/- रुपये रोख रक्कम हिसकावुन घेत असताना फिर्यादी यांनी त्यास विरोध करता आरोपी यांनी फिर्यादी यांना मारहाण करुन त्यांचे डोक्यातमध्ये दगड मारुन गंभीर दुखापत करुन जबरी चोरी करुन तेथुन पळुन गेले म्हणुन आचोळे पोलीस ठाणे गु.र.नं- ०५/२०२५ भा.न्या.संहीता ३०९(६),३(५) प्रमाणे दिनांक ०३/०१/२०२५ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

वरील प्रमाणे गुन्हा नोंद झाल्यानंतर व सदर गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेवुन वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली नमुद अनोळखी चोरट्यांचा शोध घेणेबाबत गुन्हे प्रकटीकरण शाखेचे अधिकारी व अंमलदार यांना सुचना देण्यात आल्या होत्या. त्याप्रमाणे गुन्हे प्रकटीकरण शाखेचे अधिकारी अंमलदार यांनी कौशल्यपुर्ण नमुद गुन्हयाचा तपास करुन नमुद गुन्ह्यातील एका आरोपीची ओळख पटवुन आरोपी नामे १) मोहित ऊर्फ मयंक राजिव चौव्हाण, वय-१८ वर्षे, **राहणार- अलकापुरी, नालासोपारा पुर्व ता.वसई २) करण किशोर दंतानी, वय-२८ वर्षे, राहणार - अलकापुरी, नालासोपारा पुर्व ता.वसई जि.पालघर व त्यांचा साथिदार ३) लव ऊर्फ मोनु रमेश सरोज वय-२३ वर्षे, राहणार- एव्हरशाईन सिटी, वसई पुर्व ता.वसई जि. पालघर** यांना ताब्यात घेवुन फिर्यादी यांचेकडुन जबरी चोरी केलेला मोबाईल, हातातील कडे, हातातील आंगठी व रोख रक्कम असे २१,०००/- रुपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करुन गुन्ह्याची यशस्वी उकल केली आहे.

सदरची कामगिरी मा. श्री. मधुकर पाण्ड्ये, पोलीस आयुक्त सो, मा. श्री. दत्तात्रय शिंदे, अपर पोलीस आयुक्त सो, मा. श्रीमती पौर्णिमा चौगुले-श्रींगी, पोलीस उप आयुक्त परिमंडळ- २, मा.श्री. उमेश माने-पाटील, सहाय्यक पोलीस आयुक्त तुळींज विभाग यांचे मार्गदर्शनाखाली श्री. सुजितकुमार पवार, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, आचोळे पोलीस ठाणे, पोलीस निरीक्षक/विशाल खैरे (गुन्हे),गुन्हे प्रकटीकरण शाखेचे सपोनि/यशपाल सुर्यवंशी,पोउनि/मंगेश वडणे, पोहवा/दत्तात्रय दाईंगडे,पोहवा/शंकर शिंदे, पोअं/निखील चव्हाण, पोअं/विनायक कचरे, पोअं/अमोल सांगळे, पोअं/मोहनदार बंडगर, पोअं/मनोज पाईकराव, पोअं/गोविंद गुट्टे, पोअं/लोकेश कुवर, यांनी यशस्वी रित्या केलेली आहे.




---------------oo--------------------